# 14 डिसेंबर

## आजचा सुविचार :

"जीवन हा एक पाण्याचा प्रवाह आहे, समुद्र गाठायचा असेल, तर खाचखळगे पार करावेच लागतील."

## आजचे पंचांग :

वार – मंगळवार
दिनांक : 14 डिसेंबर 2021
तिथी – मार्गशीर्ष
नक्षत्र – अश्विनी
सूर्योदय – सकाळी 7.05 वाजता
सुर्यास्त – सायंकाळी 6. 01 वाजता

## आजचे दिनविशेष :

- राष्ट्रीय ऊर्जा संवर्धन दिवस.
- 1997 ला ग्रीनहाउस गॅसचे उत्सर्जन कमी करण्यासाठी सर्व देशांची संमती.
- 1971 ला भारताचे परमवीर चक्र पुरस्काराने सन्मानित झालेले मिलिटरी ऑफिसर निर्मल जीत सिंग शहीद झाले होते.

## आजचे इंग्लिश शब्द :

1) Far – दूर 2) Near - जवळ 3) First – पहिला 4) Last - शेवटचा

## आजची प्रश्नमंजुषा :

1) एका आठवड्यात किती दिवस असतात?
2) आपल्या राज्याची राजधानी कोणती?
3) तुमच्या नावामध्ये इंग्रजी अक्षरांची संख्या किती आहे?
4) सध्या कोणता ऋतू आहे?

## बोधकथा :

### लाडूची चोरी

पूर्वीच्या काळची गोष्ट आहे, दोन तरूण एका मिठाईच्या दुकानात गेले, दुकानदाराचे लक्ष दुसरीकडे आहेसे पाहून त्यातल्या एका मुलाने जवळच असलेल्या एका थाळीतील एक लाडू उचलला आणि दुस-या मुलाच्या हाती दिला, त्याने तो लाडू पटकन खिशात टाकला, थाळीतील एक लाडू कमी झाल्याचे लक्षात येताच तो हलवाई त्या तरूणांना म्हणाला,"तुम्ही दोघेचजण इथे आहात तेव्हा तुम्हां दोघांपैकीच कोणीतरी एकाने तो लाडू चोरला आहे,"

यावर प्रत्यक्षात लाडू चोरणारा तरूण म्हणाला,"देवाशप्पथ, मी खरं सांगतो की लाडू माझ्याकडे नाही." ज्याच्या खिशात तो लाडू होता, तो तरूण म्हणाला," देवाशप्पथ खरंच सांगतो मी लाडू मुळी चोरलेला नाही." दुकानदाराला खरे काय ते माहित असूनही केवळ यांच्या भाषिक कसरतीमुळे त्यांची चोरी सिद्ध करू शकला नाही.

तात्पर्य: भाषेच्या कसरतीमुळे एखादा इसम निरपराधी असल्याचे सिद्ध करता आले नाही तरी प्रत्यक्षात तो अपराधी असू शकतो.